डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/ 306/२०२२ दिनांक :- 13 DEC 2022

### जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. ०१/०१/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदाराकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २७.१२.२०२२** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ – या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | चवळी, कुळीथ, भुईमुग, कलिंगड पिकांना पाणी देणे, खते घालणे, पीक संरक्षक औषधाची फवारणी करणे, बेणणी करणे, सदर पिकांची काढणी / तोडणी करणे, नारळ बागेची गवत काढून साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र | आंबा, काजू मातृवृक्ष बागांची गवत काढून साफसफाई करणे, प्रक्षेत्रावरील कुंपण घालणे, प्रक्षेत्रावरील नारळ फळे गोळा करणे, काजू बी गोळा करणे, काजू बी धुऊन वाळवणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इ. ना पाणी घालणे, पीक संरक्षक औषधे/संजीवके इ. ची फवारणी करणे, फूट काढणे, बेणणी करणे, काजु व खिरनी बी रूजत घालणे. तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०२ |
| ०५ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | काजु, चिकु व काळीमिरी कलमांसाठी पिशव्यांत पॉटींग मिश्रण भरणे, पिशव्या शेडमध्ये लावणे, काजु व चिकु कलमे बांधणेकरीता डिफॉलीएशन करणे, कलमकाड्या काढून चिकु व काजू कलमे बांधणे, काळीमिरी छाट पिशवीमध्ये लावणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे | ०३ |
| | | एकूण | १४ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :–**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२.३० व दु. ०२ ते ०५.३० )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा. ( सका. ९.०० ते ०१.३० व दु. ०२ ते ०५.३० )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,
ता. लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :–**

१. मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदर जाहीर नोटीस चा मसुदा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करून मिळावा.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

/– सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.